

# Student Achievement

Our Student of **M.Sc. Organic Chemistry, Ms. Pallavi Babasaheb Dabhade** was honoured with a certificate as well as a trophy for participating in 1000 poems by 1000 poets in the Grand Book Publishing Scheme organized by **Shabdagandh Group Publication Aurangabad**.









## मी स्त्री बोलतेय..

लक्ष्मी, सरस्वती ,काली
कित्तेक रूप माझे,
हुंड्यासाठी जिवंत मला जाळताना
हात कसे थरथरले नाही तुझे...||

जन्म घेताच क्षणी मला
दुसऱ्याचे धन ठरविले जाते,
लग्नानंतर या धनाला
मजुरासारखे राबवले जाते...||

तुझीच असते रे बहीण मी
असते कुणाची आई,
वेश्या सारखा उपयोग माझा
लाज कशी रे वाटत नाई,

समाजाच्या त्या राक्षसी नजरेतून
स्वतःलाच सोडवायचा आहे
चाली रिती सर्व तोडुनी,
आकाशात उंच उडायचं आहे....||

कवियत्री : पल्लवी बाबासाहेब दाभाडे
पिंपळगाव लेप, ता: येवला,जि:नाशिक

शहाजोग हे दुःख खरोखर लाडे लाडे करते बाऊ
डाव रडीचा हा संपत नाही हर्षाने मी कुठवर धावू..

घाव मनाचे झाले उपवर
आठवताना जुने सारे
सहवासातल्या गोड क्षणांचे
झडले का मोरपिसारे
पत्रामधले अक्षर अक्षर पुन्हा पुन्हा कितीदा औवू...
शहाजोग हे दुःख खरोखर...

अंथरली मी ही स्वप्न कधीची वेदनेच्या काठावरती
लाट उसळते गाते विराणी पापणीला येते भरती
डबडबलेल्या डोळ्या भवती काजळ काळे नको लावू..
शहाजोग हे दुःख खरोखर....

## कधीअसही जगाव लागत...

खोट्या हास्याच्या पड्द्या आड
खरे दुःख लपवाव लागतं
कर्तव्याच्या नावाखाली स्वतःला
दाववाव लागत इतराना आनंदी
ठेवण्यासाठी डोळ्यातलं पाणी
लपवाव लागत
खुप इच्छा असुन देखील
नाही म्हणाव लागतं
खुप प्रेम असुन देखील
नाही अस दाखवाव लागतं
अस इतरांना हसवता हसवता कधी
खुप रडाव लागतं
कधी कधी असही जगाव लागतं...

## .....बळीराजा .....

रोज शेतामधी राबणारा
माझा बळीराजा
कष्ट त्याचे खूप
कधी मिळेना रजा

थांबावं लागत नाही
पगारासाठी महिनाभर
घरगुती खर्चाच्या काळजीचं
वजन त्याच्या डोईवर

नसे त्याला कधी
आजारपणाचे सुट्टी
उजाड माळरानाशी
जमली त्याची गट्टी

मालाला मिळेना दरवाढ
शेतीसाठी कर्ज काढी चक्रवाढ
संप नाय की बंद नाय
सुचत नाही कराव काय

पावसाच्या जीवावर
खेळतो शेतीशी जुगार
पिकलं सोन की
मिळणार वर्षाचा पगार

नाळ त्याची जोडली मातीशी
कष्ट रोजच सकाळ नी रातीशी
नाही मिळणार कधी त्याला पेन्शन
आयुष्य जगावं कसं हेच टेन्शन



कवितेचे नाव : 🌹 स्त्री एक शिल्पकार 🌹

अत्याचारी दुनियेत होतो,अमानुषपणे बलात्कार
दाखव तू ही सखी आता, काकीकेचा रौद्रावतार...||

नाहीस तू ग अभागी, नाहीस तू ग ललना
स्त्री-पुरुषाच्या कायद्याने समान आता तुलना...||

सोडून पाश बंधनाचे, तुला जगावे लागेल
कधीतरी तुला देखील कठोर व्हावे लागेल...||

तुझ्याच उदरातून झाली, या सुंदर विश्वाची निर्मिती
प्रबोधनाच्या मशालीने घडविली समान क्रांती...||

याच क्रांतीतून पेटाव्या, शिक्षणाच्या ज्ञानज्योती
तेव्हाच होईल नारीची, अत्याचारातून मुक्ती...||

पेटलेल्या लखलखत्या ,ज्योतीची आहेस तू ग वात
अन्याय अत्याचारावर तुला करायचे आहे मात...||

तूच रागिनी तूच दामिनी, या संसाराची तूच स्वामिनी
शतशः नमन तुलाच बाई, तूच माता तूच आई...||

नको कुणाचा आसरा ,नको कोणाचा आधार
तूच आहे जीवणाची खरी, स्त्री एक शिल्पकार...||

नाव : पल्लवी बाबासाहेब दाभाडे
पत्ता : रा. पिंपळगाव लेप, ता. येवला ,जि.नाशिक

# " आयुष्य "

वळणोवळणीच्या वळणावरती ,
आयुष्य वळूनी गेले ।
सुख-दु:खाच्या ठेचा आठवुनी ,
नयन भरुनी आले ।

कधी फुलांच्या गालीच्यावरूनी ,
तर कधी काट्यांच्या सड्यावरूनी ।
आयुष्याचे सोनेरी क्षण ,
भर्रकन निघूनि गेले ।

रंगापरी खेळ रंगले ,
बालपणीचे खेळ ।
पावलांवरती पाऊल ठेवुनी ,
साधलाय जगण्याचा मेळ ।

आठवे पाटीवरचा ,
गिरवूनी काढलेला गिरवलेला एक ।
फिरता फिरता फिरुनी गेले ,
आयुष्यात घड्याळाचे बारा आकडे अनेक ।

डोंगरापरी चढउतार करीत ,
जीवन नयनरम्य झाले ।
या गोल गोल चक्रव्यूहात ,
आयुष्य अडकूनी गेले ।

गाठलाय टप्पा शेवटचा ,
पण आठवे क्षण बालपणाचा ।
आठवूनी ऊर दाटुनी आला ,
फिरलेला हात मायेचा ।

कवियत्री : पल्लवी दाभाडे

## श्वास सुगंधी....

कणकण झुरले,देहात मिसळले श्वास सुगंधी दरवळले
रानाच्या झाडीतुनी या अलगद पाय कुणाचे सळसळले ।।

थांब घडीभर सुरू दे हा गलका
प्रीत गुलाबी ही बावरली
भिरभिरणारी वा-याची ही अवखळ
नजर चहाडी सावरली
जोखमीचे हे युध्द एकांती सैन्य मनीचे डळमळले
कणकण झुरले,देहात मिसळले श्वास सुगंधी दरवळले ।।

हटकून हसला मोगरा वेणीत
सुगंधाची पेरून नक्षी
नजरेची या होता किलबिल
चांदणं चाहूल तुझ्या वक्षी
झ-या काठचे नितळ,अवखळ पाणी सुनामी खळखळले ....
कणकण झुरले, देहात मिसळले श्वास सुगंधी दरवळले ।।



## सूर्याची कथा..

नागवे उन्हाचे डंख
पोळले पंख
करपली ज्वारी
आटले पाण्याचे तळ
टाकुनी गळ
उतरल्या घारी

कोरडा जीव हैराण
कुणी वैराण
सोडला हा देश
झाला जीव बावरा
परकी धरा
आठवली वेश

वाहते रक्ताची नदी
दारी द्रौपदी
लावते पणती
कंठात गोठली व्यथा
सूर्याची कथा
सांगते कुणती

## बाप म्हणजे...

अपरिमित कष्ट करणार शरीर,
सुरकुतलेल डोळे आणि थकलेला जीव,
अपरिमित काळजी करणार मन,
स्वतःच्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेवून
मुलांसाठी झटणार अंत:करण ❤

फाटले नाते जरीही आपले..
वाद मिटवू चल गडे दोघातले !

न्याय देणाराच आहे तोतया
तू किती देशील त्याला दाखले !

शब्दही तू बोलली नाही जरी..
चेह-याचे भाव मीही वाचले

मान्य केला फक्त नाईलाज तू..
ते खरे नाते न होते आपले !

केर काढावा कसा मी आतला ?
जर मनाचे घर धुळीने माखले

काल होती ओल ज्यांची लाभली
ऐनवेळी ते झरेही आटले

मोडला नाही कणा त्यांचा कधी
शिर जयांचे नम्रतेने वाकले

घातही करणार नक्की ते उद्या
आज ज्यांनी शस्त्र खाली टाकले

## बालपण

कागदाची "नाव" होती...
पाण्याचा "किनारा" होता...
मित्रांचा "सहारा" होता...
खेळण्याची "मस्ती" होती...
मन हे "वेडे" होते...
"कल्पनेच्या" दुनियेत जगत होते...
कुठे आले या,
"समजूतदारीच्या" जगात...
यापेक्षा ते भोळे,
"बालपणीच सुंदर होते....!!!

【कवयित्री: पल्लवी दाभाडे】

# माणुसकीची लाट

कवियत्री : पल्लवी दाभाडे

गरीब नाही श्रीमंत नाही
श्रेष्ठ नाही कोणी
नैसर्गिक आपत्तीसमोर टिकतं
नाही कोणी . .

संसार गेले वाहून
तरी सोडली नाही साथ
त्यामुळेच सर्वांना दिसली
माणुसकीची लाट . .

जवान आले धावून
लगेच त्यांच्या मदतीला
पूरग्रस्तांनी जवानांमध्येच
देव आपला पाहिला . .

महापुराचा विळखा
धडा देऊन गेला
शेवटी माणसाला माणूसच
लागतो
नकळत सांगून गेला!!

## मुलगी

मुलगी काय असते
कशी असते मुलगी
किती प्रेमळ वेगळी असते
फुलाहून कोमल असते
वज्राहून कठीण असते
जेव्हा ती असते तेव्हा वाटते की
आपल्या जीवनात आशेचा
किरण बनून आली
वडिलांची लाडकी आईचा जीव
तर आजी-आजोबांच्या
डोळ्यांचा तारा असते
धबधब्यासारखे खळखळणारी
पक्ष्यांसारखे उडणारी
जेव्हा ती तेथे जगात
तेव्हा अशी चा दिवा घेऊन येते
लक्ष्मी सरस्वती चे रूप
संकटाचा सामना करणारी
आई वडिलांचे नाव मोठे करणारी
पित्याच्या अंगणाची शोभा असते
त्यागाची मूर्ती नमते चे रूप
आईच्या हृदयाची भाषा असते
फक्त मुलगा हवा असे मानणार्यांना
मुलगी यापेक्षाही मुलगी कर्तबगार असते

## तुमच्या अस्तित्वामुळे

काळोखमय समाज आमचा होता
काहीच अस्तित्व नव्हते
तेव्हा तुम्ही आलात बाबासाहेब
आमच्या अस्तित्व नसलेल्या जीवनात
आणि आम्हाला अस्तित्व मिळाले.

आम्ही आता जगतो आनंदाने
तुम्ही दिलेल्या सवलतींचा लाभ घेत
तथागत भगवान बुद्धांच्या मार्गावरून
तुमच्या अनंत उपकारामूळे.

डॉ बाबासाहेब तुमच्यामुळे
आम्ही शिकणारे झालोय
आता मानसन्मान मिळतो आम्हाला
आणि स्वाभिमानाचे जीवन जगतो.

बाबासाहेब तुम्ही झालात
या देशाचे घटनाकार
आणि आम्हाला हक्क अधिकार मिळाले
आता मोठमोठ्या पदांवर आहोत
केवळ तुमच्यामुळे
तुमच्या अस्तित्वामुळे.

## जीवनाचे महत्त्व

जन्माला आली आहेस
थोडं जगून बघ
जीवनात दुःख खूप आहे
थोडं सोसून बघ
चिमुटभर दुःखाने कोसळू नकोस
दुःखाची पहाड चढून बघ
यशाची चव चाखून बघ
अपयश येतं निरखून बघ
डाव मांडणं सोपं असतं
थोडं खेळून बघ
घरटे बांधणं सोपं असतं
थोडी मेहनत करून बघ
जगणं कठीण मरणं सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ
जीणं मरणं एक कोडं असतं
जाता-जाता एवढं सोडून बघ...

स्वलेखन

### ... आक्षेपीत दृष्टी ...

व्यथेला पांघरु थोडे, सुखाला आसरा देवू,
उन्हाच्या ओजळीलाही, जरासा गारवा देवू,
ओलावा लागतो आहे, नभाला त्या सरींचा,
कोरड्या त्या देहाला, भावनेचा स्पर्श हा देवू...

पुरे झालेत स्वःताला पाहणे नजरेत लोकांच्या,
गिळण्यास शोक मनांतील त्यांच्या, जरासा उभरा देवू,
भेटण्यास सुख या जगात जराशी वाट आहे,
दुःखा ला ही आता थोडी, चाखून मात देवू...

अती गोड लागावा, सवांद हा त्यांचा,
कधी भांडुन स्वःताशी, चवीला वेदना देवू,
मोडक्या या दुनियेत, माणसे सरळ आहेत,
करण्यास त्यांना सिद्ध, कधी पैज ही लावू...

कवियत्री : पल्लवी दाभाडे

### माणसे गेली कुठे...

वादळाला रोखणारी माणसे गेली कुठे?
अंधाराला जाळणारी माणसे गेली कुठे?

कोणता अंधार भेदतो इथे प्रकाशाला
उजेडाला पेरणारी माणसे गेली कुठे?


कोंबड्याची झुंज जरी लावली जाते इथे
विचाराने पेटणारी माणसे गेली कुठे?

वाटते कुणा देवता विद्येची सरस्वती
सन्मानाने जागलेली माणसे गेली कुठे?


मांडू नका गड्यांनो बाजार चळवळीचा
पोसणारी समतेला माणसे गेली कुठे?

पेरला जातो रोज नवा अध्याय येथे
शिवाराला राखणारी माणसे गेली कुठे?

## फक्त कवितेच्या दुनियेत.....



# लेक



लेकीची चूक असल्यावर पदराखाली
घातली जाते,
तीच चूक सूनेकडून झाल्यावर
तिला चव्हाट्यावर मांडली जाते.

लेकीने ड्रेस घातला की;
ती सुंदर दिसते,
मात्र,सुनेने ड्रेस घातला की;
तिथे संस्काराची बात येत असते.

लेकीला लग्नानंतर शिकता यावं
यासाठी तस स्थळ पाहिलं जात,
मात्र,सुनेची शिकायची इच्छा असल्यावर
या गोष्टीकडे
दुर्लक्ष केलं जातं.

आपली लेक म्हणून स्वतःच्या मुलीला
समजून घेतली जाते,
मग तीच काय?? जी तुमच्या मुलासाठी
आपल घर सोडून येते..


कवियत्री : पल्लवी दाभाडे


माझ्या मना, घाबरू नकोस,
दुनियादारीच्या फितूरीला भिऊ नकोस
चटके जीवाचे सोसू नकोस,
अयोग्य कृती करू नकोस
अलत्या भलत्याच्या सांगण्यावरून
आपले आयुष्य खराब करू नकोस
पटकन विश्वास करून
मित बनवू नकोस.
धर्माच्या सोबतीने, अधर्माला जाऊ नकोस
पैस्याच्या मागे लागून
भलतंच व्यसन बाळगू नकोस
माझ्या मना, घाबरू नकोस
दुसऱ्याच विचार करताना
आपल्या कृतीला दुर्लक्षित करू नकोस
स्वप्नात जगताना
वास्तवाला विसरू नकोस
धैर्य जरूर पूर्ण करू
पण तुला घडविण्याऱ्या आई-बाबाला विसरू नकोस
चटके कष्टाचे सोसतांना
प्रामाणिकपणाला सोडू नकोस
माझ्या मना तू
घाबरू नकोस घाबरू नकोस....

🤗रम्य ते बालपण ❤️

ते गोजिरवानं
निरागस जिनं
नसे कंटाळवानं
रम्य ते बालपण ।।
बालपणाच्या
आठवणीत
गुंतले मन
रम्य ते बालपण।।
आजी आजोबांच्या
गोष्टी अन् संस्कार
नात्यांची ती गुंफण
रम्य ते बालपण।।
माती अंगाला लागणे
पाण्यात मुक्त खेळणे
बालमित्रात ते रमणं
रम्य ते बालपण। ।
दुडुदुडु ते चालणं
बोबडे ते बोलणं
निरागस ते हसणं
रम्य ते बालपण।।


कवितेच्या दुनियेत...
नाही जिद्द हरली अजुनी.
ठाण मांडूनी बसली
मनी!
मोडला नाही अजून कणा.
मोडलातरी... उभा करेल
पुन्हा!
हरले जरी पुन्हा पुन्हा मी.
तो माझा अंत नाही!
पेटून उठेल पुन्हा नव्याने मी.
रक्ताचा थेंब अजूनी गोठलेला
नाही!
तक धरुनी बसले बाहूंमध्ये
बळ.
उरीच्या स्वप्नांसाठी गाठलाय
तळ!
कष्ट आजचे.उजळणी
आयुष्य पुढे.
कस्तुरीमृगप्रमाणे गंध
दरवळी चहूंकडे!
देऊनी जयघोषाची
ललकारी.
घेऊनी उंचच उंच भरारी!
दे खोणी यश आपले.
माय पित्याचे मनभरी!!
-पल्लवी दाभाडे


आयुष्य प्लुटो सारखं जगावं...
आयुष्य प्लुटो सारखं जगावं.
कुणी येतात शोध घेतात
नवीन मित्र सापडला म्हणतात
मोठे नाव सन्मान देतात.
.
कालांतराने, "हा तर खूप छोटा" म्हणतात.
"मित्र व्हायच्या लायकीचा नाही" म्हणतात.
पुन्हा जवळून येऊन निरखून जातात
"काय करावे याचे" बोलतात.
.
हा लहान तो मोठा करणारे
द्विधा मनाचे छोटे छोटे जीव..
असो. त्यांचे त्यांच्यापाशी.
अनेक येतील. अनेक जातील.
आपण मात्र आपले, सूर्य रुपी
ध्येयाभोवती अखंड फिरत राहावं.
.
कवियत्री- पल्लवी दाभाडे


मन हे आरशापुढे नागवते का?
सड वासराची भूक भागवते का?
किती रात्री आल्या गेल्या सखे परंतु
सांग ही पौर्णिमा तुला जागवते का?
शहर आले तुझे झगमगणारे
कंदील सोबती जुना वागवते का?
आठवणी चिंब भिजल्यावर पुन्हा
सायंकाळ नदीकाठी उगवते का?
ओठावरी चांदणे फुटल्यावरती
माय तुझी अजूनही रागवते का?

गगनी अंधार दाटला ,
साजरा चंद्र मुखडा दिसला ।
एडिसनच्या लाइटसारखा ,
आम्हास तो भासला ।
कोजागिरीच्या पुनवेला ,
वाढती दुधाचे ते मोल ।
आर्यभट्टांनी शोधलेला ,
शुन्य जसा गोल ।
कणकण वाढती चंद्रकोर ,
मना होईल आकर्षण ।
शोध लागला जसा ,
न्यूटनचा गुरुत्वाकर्षण ।
चंद्रासोबती राहण्याचा ,
चांदण्यांनी मिळविला मान ।
थॉमसननी शोधलेला ,
जणू न्यूक्लिअस भोवती इलेक्ट्रॉन ।
आली अमावस्या ,
झाला तू गहाळ ।
राइट बंधूंच्या विमानासारखा ,
होई इकडून तिकडे तू पसार ।



## पणती बनून राहू...

जळण्याची ही गुलामी
का जुलूमांचा पाढा
मनातल्या घरट्याचा
काळा पडला आढा

मने दुभंगली सारी
फुटलेल्या काचेवाणी
जात्याच्या ओठावरची
जशी हरवली गाणी

असे केविलवाणे दु:ख
रोज नव्याने येथे
स्वप्नांच्या सरणावरती
जळतात इमानी प्रेते

ओंजळीत घेऊ पणत्या
उजळवू दिशा दाही
सांदीमधल्या अंधाराला
उजेड देऊ काही

वात होऊनी तेऊ
स्वप्ने नव्याने पाही
अंतरीच्या गाभाऱ्यात
पणती बनून राहू




पल्लवी दाभाडे
येवला